सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/३३५** **दि. ०४/११/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व विभाग,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : वंदे मातरम्" गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त गीताचे सामूहिक गान करण्याबाबत.**
**संदर्भ : मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी) यांचे रा.भ. / ई.डी.एल.१/सामान्य.२०२५/सी.आर-/८९४ दि. ३ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी "वंदे मातरम्" या गीतास १५० वर्षे पूर्ण होत आहेत. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये "वंदे मातरम्" या गीताचे सामूहिक गान होणार आहे. राज्यातील सर्व विभागांतील शासकीय व निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी "वंदे मातरम्" या गीताचे सामूहिक गान करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मा. राज्यपालांचे अवर सचिव यांनी मा. कुलगुरू यांना सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यापीठ स्तरावरील सर्व विभागातील तसेच विद्यापीठाशी संलग्नीत महाविदयालयातील प्राचार्य, प्राध्यापकवृंद, इतर सर्व कर्मचारी आणि सर्व विदयार्थी यांनी "वंदे मातरम्" या गीताच्या सामुहिक गान प्रसंगी विदयापीठ व त्या त्या महाविदयालयाच्या ठिकाणी **अनिवार्यपणे** उपस्थित राहण्यासाठी महाविदयालयातील सर्वांना विद्यापीठामार्फत निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती केली आहे.

तरी आपणास अशी विनंती करण्यात येते की, दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागामधील प्राध्यापकवृंद, इतर सर्व कर्मचारी आणि सर्व विदयार्थी यांनी "वंदे मातरम्" या गीताच्या सामुहिक गान प्रसंगी अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबत सूचित करण्यात यावे.

वरील संदर्भातील निर्देश सर्व घटकापर्यंत पोहोचवण्याकरीता आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह /उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना व इतर सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी "वंदे मातरम्" या गीताच्या सामुहिक गान प्रसंगी अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे. सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

माननीय राज्यपाल यांना माहितीस्तव याबाबतचा अहवाल सादर करावयाचा असल्याने आपल्या महाविद्यालय/ मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या "वंदे मातरम्" या गीताचे सामुहिक गान याबाबतचा अहवाल (www.Unipune.ac.in - BOD - BOD online - Login - User Name & Passward - Online Services - Student Development - Menu - gov joint scheme - other joint scheme Add new - योजना निवडा – वंदे मातरम् या गीताचे सामुहिक गान अहवाल) येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने तात्काळ भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

रा.भ./ई.डी.एन.१/सामान्य-२०२५/सी.आर-२००/८८४

GOVERNOR'S SECRETARIAT
RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

दिनांक 3 नोव्हेंबर २०२५

प्रति,

सर्व कुलगुरु, महाराष्ट्र राज्य.

विषय : "वंदे मातरम्" गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये या गीताचे सामूहिक गान करण्याबाबत.

संदर्भ : दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५, मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, यांचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये राज्यातील सर्व विभागांतील शासकीय व निमशासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी "वंदे मातरम्" या गीताचे सामूहिक गान करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत (प्रत संलग्न).

तसेच, दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी "वंदे मातरम्" या गीतास १५० वर्षे पूर्ण होत आहेत. दिनांक ७/११/२०२५ रोजी राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये "वंदे मातरम्" या गीताचे सामूहिक गान होणार आहे. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्वाची भूमिका बजावलेली आहे.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विदयापीठ स्तरावरील सर्व विभागातील तसेच आपल्या विदयापीठाशी संलग्नीत महाविदयालयातील प्राचार्य, प्राध्यापकवृंद, इतर सर्व कर्मचारी आणि सर्व विदयार्थी यांनी "वंदे मातरम्" या गीताच्या सामुहिक गान प्रसंगी विदयापीठ व त्या त्या महाविदयालयाच्या ठिकाणी **अनिवार्यपणे** उपस्थित राहण्यासाठी आपल्या अधीनस्थ महाविदयालयातील सर्वांना आपणामार्फत निर्देश देण्यात यावेत, अशी आपणांस विनंती आहे.

आपणांस अशी ही विनंती करण्यांत येते की, याबाबातचा अहवाल माननिय राज्यपालांच्या माहितीस्तव या कार्यालयास पाठविण्यांत यावा.

विकुलकर्णी 3/XI/2025

(विकास कुलकर्णी)

मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण)(प्रभारी)